
संत कान्होपात्रा अभंग रचना
प्रकाशन, मंगळवेढा

**संत कान्होपात्रा**

SANT KANHOPATRA

❁

**प्रकाशक**

सप्तर्षी प्रकाशन

गट न.८४/२, दामाजी कॉलेजच्या पाठीमागे, मंगळवेढा

जि.सोलापूर-४१३३०५

❁

**प्रथमावृत्तीः १७ जुलै २०१४**

❁

**मुखपृष्ठः**

सप्तर्षी डी.टी.पी.

❁

**मुद्रकः**

किशोर तु.घुले

सप्तर्षी डी.टी.पी.

मंगळवेढा

❁ मूल्यः मोफत

# संत
# कान्होपात्रा
# अभंगरचना

।।१।।



दीन पतित अन्यायी । शरण आले विठाबाई ।।१।।

मी तो आहे यातीहीन । न कळे काही आचरण ।।२।।

मज अधिकार नाही । शरण आले विठाबाई ।।३।।

ठाव देई चरणापाशी । तुझी कान्होपात्रा दासी ।।४।।

## ।।२।।

वर्म वैरियाचे हाती । देऊ नको श्रीपती ।।१।।

तू तो अनाथाचा नाथ । दीन दयाळ कृपावंत ।।२।।

वेद पुराणे गर्जती । साही शास्त्रे विवादती ।।३।।

चरणी ब्रिद वागविसी । तुझी कान्होपात्रा दासी ।।४।।



## ।।३।।



जीवीचे जिवलगे माझे कृष्णाई कान्हाई ।

सांवळे डोळसे करुणा येऊ दे कांही ।।१।।

आला अपवाद याती संबंध लौकिक पाही ।

सावळे डोळसे करुणा येऊ दे काही ।।२।।

दीनोद्धार ऐसे वेदशास्त्रे गर्जती पाही ।

सावळे डोळसे करुणा येऊ दे काही ।।३।।

शरण कान्होपात्रा तुजला वेळोवेळा पाही ।

सावळे डोळसे करुणा येऊ दे काही ।।४।।


## ।।४।।

माझे माहेर पंढरी । सुखे नांदू भीमातीरी ।।१।।

येथे आहे मायबाप । हरे ताप दरुशने ।।२।।

निवारिली तळमळ चिंता । गेली व्यथा अंतरीची ।।३।।

कैशी विटेवरी शोभली । पाहुनी कान्होपात्रा धाली ।।४।।



## ।।५।।

नको देवराया अंत आता पाहू । प्राण हा सर्वथा फुटो पाहे ।।१।।

हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले । मजलागी जाहले तैसे देवा ।।२।।

तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी । धावे हो जननी विठाबाई ।।३।।

मोकलोनी आस जाहले उदास । घेई कान्होपात्रेस हृदयात ।।४।।



## ।।६।।

घ्या रे घ्या मुखी नाम । अंतरी धरोनिया प्रेम ।।१।।

माझा आहे भोळा बाप । घेतो ताप हरोनि ।।२।।

आपुलिया नामासाठी । धावे संकटी लवलाहे ।।३।।

घ्यारे घ्यारे अनुभव । कान्होपात्रेचा माधव ।।४।।



## ।। ७ ।।

योग याग तपे करिता भागली । तीच ही माऊली विटेवरी ।।१।।

न येई ध्यानी साधिता साधनी । भक्तासी निर्वाणी धावतसे ।।२।।

चारी वेद साही शास्त्रे शिणली । कान्होपात्रा लाधली प्रेमसुखे ।।३।।



## ।।८।।

आलंकापुरी पुण्यठाव। तेथ समाधी ज्ञानदेव ।।१।।

पांडुरंगें दीधला वर । भेटी निर्धार कृष्णपक्षीं ।।२।।

नित्य स्नानालागीं जाणा । भागीरथी दिधली ज्ञाना ।।३।।

सरस्वती मणिकर्णिका । त्रिसंगमीं वाहती देखा ।।४।।

येथें स्नान करितां । वास वैकुंठीं तत्त्वतां ।।५।।

ऐसे देव सांगता । कान्होपात्रा आनंदता ।।६।।



## ।।९।।

शिव तो निवृत्ति विष्णु ज्ञानदेव पाही । सोपान तो ब्रह्मा मूळ माया मुक्ताई ।।१।।

धन्य धन्य धन्य धन्य निवृत्तीराया । धन्य ज्ञानदेव सोपान सखया ।।२।।

प्रत्यक्ष पैठणीं भटां दाविली प्रचिती । रेडियाचे मुखें वदविली वेदश्रुती ।।३।।

चौदाशे वरुषचे तप्ती तीर रहिवाशी । गर्व हरविला चालविले भिंतीशी ।।४।।

धन्य कान्हुपात्रा आजी झाली भाग्याची । भेटी झाली ज्ञानदेवाची ह्मणुनिया ।।५।।



।।१०।।

सकळही सुरवर येथेंची लाधले । देवचें देखिलें चरणांबुज ।।१।।

हरली ती भूक तहान निमाली । संतांची देखिलीं चरणांबुजें ।।२।।

किर्तनाचे रंगी आनंदें नाचतां । कान्होपात्र चित्ता समाधान।।३।।



**।।११।।**

अगा वैकुंठींच्या राया । अगा विठ्ठल सखया ।।१।।

अगा नारायणा । अगा वसुदेवनंदना ।।२।।

अगा पुंडलीक वरदा । अगा विष्णु तूं गोविंदा ।।३।।

अगा रखुमाईच्या कांता । कान्होपात्रा राखी आतां।।४।।



## ।।१२।।

पतित तूं पावना । म्हणविसी नारायणा ।।१।।

तरी सांभाळीं वचना । ब्रीद वागविसी जाणा ।।२।।

याती शुद्ध नाही भाव। दुष्ट आचरण स्वभाव ।।३।।

मुखीं नाम नाहीं । कान्होपात्रा शरण पायीं ।।४।।



## ।।१३।।

माझ्या जीवींचे जीवन । तो विठ्ठल निधान ।।१।।

उभा असे विठेवरी । वांटी प्रेमाची सीदोरी ।।२।।

आलीयाची धनी । निवारितो चक्रपाणी ।।३।।

भेटा दयेच्या सागरा । विनवितसे कान्होपात्रा।।४।।



## ।।१४।।

अंबऋषीसाठी । जन्म घेतलें जगजेठी ।।१।।

वागदी भक्तांचा आभार । ऋणी झाला निरंतर ।।२।।

अर्जुनाचे रथीं बैसे । त्याचे घोडे धुतसे ।।३।।

लाज सांडी ऋषीकेषी । कान्होपात्रा तुझी दासी ।।४।।



## ।।१५।।

ज्यांचे घेतां मुखीं नाम । धाकीं पडे काळ यम ।।१।।

ऐशी नामाची थोरी । उद्धारिले दुराचारी ।।२।।

नष्ट गणिका आजामेळा । वाल्मिकी झाला तो सोज्वळ ।।३।।

ऐशी नाम माळा । कान्होपात्रा ल्याली गळा।।४।।



## ।।१६।।

विठू दीनांचा दयाळ । वागवी दासाची कळकळ ।।१।।

देव कृपावंत मोठा । उणें पडों नेदी तोटा ।।२।।

देव भक्तांचा अभिमानी । वाहे चिंता सकळ मनीं ।।३।।

देव भावाचा भुकेला । कान्होपात्रा आनंद झाला ।।४।।



**।।१७।।**

कनवाळू कृपाळू तूं माय माऊली । धावुनियां भेटली विठाबाई ।।१।।

निवारिलीं विघ्नें दुरी तें पळालीं । जोडुनियां कर विठाई विनविली ।।२।।

शरण कान्होपात्रा चरणीं निमाली । बांधोनियां भेटली विठाबाई।।३।।



।।१८।।

ज्ञान वैराग्य भजलीं न तुमतें । आमुतें पंढरीनाथें न विसरीजे ।।१।।

दंभ प्रपंच भजली न तुमतें । आमुतें पंढरीनाथें न विसरीजे ।।२।।

विनवी कान्होपात्रा पंढरीरायातें । आमुतें पंढरीनाथे विसरीजे ।।३।।



## ।।१९।।

हरीहर बह्मादिक । जयालागीं करिती तप ।।१।।

तो हा पंढरीचा राणा । न ये अनुमाना श्रुतीसी ।।२।।

शास्त्रें पुराणें आंबावली । चारीं मौन्यची राहिलीं ।।३।।

पुंडलीक वरदायिणी । कान्होपात्रेचा जो धनी ।।४।।



**।। २०।।**

विषयाचे संगतीं । नाश पावलें निश्चिती ।।१।।

भगें पडली इंद्राला । भस्मासूर भस्म झाला।।२।।

चंद्रा लागला कलंक । गुरुपत्नीसी रतला देख ।।३।।

रावण मुकला प्राणासी । कान्होपात्रा ह्मणे दासी ।।४।।



## ।। २१ ।।

जन्मांतरीचें सुकृत आजी फळांसी आलें ।ह्मणोनी देखिले विठ्ठलचरण ।।१।।

धन्यभाग आजी डोळिया लाधलें । म्हणुनी देखिले विठ्ठलचरण ।।२।।

धन्य चरण माझे या पंथीं चालिले । म्हणुनी देखिले विठ्ठल चरण ।।३।।

येऊनिया देहासी धन्य झाले । म्हणुनि देखिले विठ्ठलचरण ।।४।।

घाली गर्भवासा कान्होपात्रा म्हणे ।जन्मोजन्मीं देखेन विठ्ठलचरण ।।५।।



## ।।२२।।

सर्व सुखाचे जें निजसुखाचें सार गे माय । तो हा पंढरिराया विटेवरी ।।१।।

सकळ साराचें सार गे माय । तो हा पंढरिराय विटेवरी ।।२।।

सर्व साधनाचें जें कां निजसाधन गे माय । तो हा पंढरिराय विटेवरी ।।३।।

जे कां जीवांचे जीवन कान्होपात्राचे निजधन ते माय । तो हा पंढरीराय विटेवरी ।।४।।



## ।। २३ ।।

पतित पावन ह्मणविसी आधीं । तरी का उपाधि भक्तांमागें ।।१।।

तुझे म्हणवितां दुजें अगसंग । उणेपणा सांग कोणाकडे ।।२।।

सिंव्हाचें भातुकें जंबुक पै नेतां । थोराचिया माथां लाज वाटे।।३।।

ह्मणे कान्होपात्रा देह समर्पणें । करवा जतन ब्रिदासाठीं ।।४।।



## ।।२४।।

नामें दोष जळती । नामें पापी उद्धरती ।।१।।

हें आलें अनुभवा । सत्यजीवा प्रत्यया ।।२।।

नामें अपार तारिलें । नामें जीवनमुक्त केले ।।३।।

कान्होपात्रा नाम घेतां । पायीं जडली तत्त्वतां।।४।।



# आमची संग्राह्य व उपयुक्त प्रकाशने व ई-बुक्स







सप्तर्षी®
प्रकाशन

सप्तर्षी असोसिएट्स ॲण्ड पब्लिकेशन्स
गट नं. ८४/२, घुले नगर,
दामाजी कॉलेज पाठीमागे,
मंगळवेढा जि.सोलापूर -४१३ ३०५
email: saptarsheeprakashan@gmail.com
saptarsheeprakashan@rediffmail.com

ई-बुकसाठी लींक www.bookganga.com/saptarsheeprakashan